# जाहिर वाहने लिलाव अटी व शर्ती

# सन 2018-19

# जाहिर लिलाव दिनांक-

1. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शा.नि.क्र.जेइपी-1096/सीआर-3588/86 दि.22 नोव्हेंबर 2000 अन्वये केलेल्या लिलावाच्या कार्यवाहीसाठी समिती नेमणेत आलेली असून समितीचा कार्यवाहीबाबतचा निर्णय अंतिम राहील. त्यावर कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.
2. वाहने आहेत तेथे त्याच स्थितीत या शर्तीवर लिलाव करणेत येत आहे. लिलाव धारकाने वाहनांची समक्ष पाहणी केली असे गृहित धरणेत येईल त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही किंवा बंधनकारक राहणार नाही.
3. लिलाव धारकाना लिलावात भाग घेणेकरिता **फी. र. रु.200/- व अनामत रक्कम** प्रती वाहन **बयाणा रक्कम रुपये 5,000/-(अक्षरी पाच हजार हजार मात्र)** बयाणा म्हणून कार्यकारी अभियंता बांधकाम यांचे नावे सिंधुदुर्गनगरी येथे देय असणारा धनाकर्ष (डि.डि) किंवा रोख रक्कम तसेच ओळखपत्र व राहत्या जागेचा योग्य तो पुरावा साक्षांकित Attested केलेला असावा.
4. ज्यांचे दर/बोली सर्वात जास्त असतील त्यांचे बोली मान्य करण्यात येतील. त्यांना उर्वरीत रक्कम आदेश दिल्यानंतर आठ दिवसाचे आत भरावी लागेल. **सदरची रक्कम न भरल्यास त्यांनी भरलेली बयाना/अनामत रक्कम जप्त करणेत येईल व सदरचा लिलाव रद्द समजण्यात येईल.**
5. प्रत्येक वाहनाची स्वतंत्र बोली लावावी लागेल. एकत्रित दर/बोली मान्य करणेत येणार नाही.
6. लिलाव समितीने सदर सर्वाधिक दरास/बोलीस मान्यता दिल्यास एकूण किंमतीच्या 25% रक्कम इसारा रक्कम किंवा पुर्ण रक्कम रोखीने/धनादेशाने (डि.डि) त्वरीत भरावी लागेल ती न भरल्यास अनामत रक्कम जप्त करणेत येईल. सदरची रक्कम कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) 11.00 ते 2.00 या वेळेत भरणा करावी लागेल
7. वाहनाचा ताबा कार्यालयीन दिवशी, कार्यालयीन वेळेत देणेत येईल वाहने उचलणेची जबाबदारी लिलावधारकाची राहील.
8. लिलाव मंजूर झालेल्या तारखेपासून वाहनाची संपूर्ण जबाबदारी लिलाव घेणाऱ्याची राहील; वाहनाचे साहीत्य कमी/जास्त झाल्यास त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.
9. वाहने देण्याची कार्यवाही ज्यांचे ताब्यात वाहन आहे त्या कार्यालय प्रमुख यांची राहील.
10. वाहने उचलून नेत असताना शासकीय मालमत्तेचे काही नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई सबंधित लिलाव घेणाऱ्यांकडून वसूल करणेत येईल.
11. कोणत्याही प्रकारचे कर उदा.जकात कर व इतर कर या बाबत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.
12. **लिलाव घेणाऱ्यास नियमानुसार विक्रीकर किंवा GST दरानुसार जो कर असेल तो भरणा करावा लागेल तसेच 20% लोकल सेस(वाहन बोली रक्कमे व्यतिरिक्त) भरणा करावी लागेल त्यानंतरच वाहनाचा ताबा देण्यात येईल.**
13. ज्या वाहनाचे आरसी पुस्तके उपलब्ध नसतील त्याबाबत प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानुसार लिलाव घेण्याऱ्याने आरसी पुस्तके स्वतः काढावयाची असून सदर जबाबदारी त्याचीच राहील. त्याचा खर्च लिलाव घेणाऱ्याने करावयाचा आहे. जी आरसी पुस्तके उपलब्ध आहेत ती अद्यावत करणेकामी नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येईल त्या बाबतचा खर्च लिलाव धारकाने स्वतः करणेचा आहे.

14. लिलाव कायम केल्याचे कळविणेत आल्यापासून 10 दिवसाचे आत वाहनाच्या उर्वरित रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. या 10 दिवसांच्या मुदतीत रक्कम न भरल्यास 13% दराने (व्याज प्रतिदिन परिगणीत करुन) व्याज आकारण्यात येईल ही मुदत 15 दिवसाची असेल या कालावधीतही रक्कम भरणा न केल्यास अनामत रक्कम व इसाऱ्याची रक्कम जप्त करण्यात येईल व निविदा रद्द करण्यात येईल.

15. लिलावधारकाने सर्व रक्कम भरल्यानंतर वाहनाचा ताबा 15 दिवसात घ्यावा अन्यथा त्यानंतर प्रत्येक दिवसा करीता प्रत्येक वाहनाकरीता रक्कम रु.100/-(अक्षरी शंभर मात्र) दंड आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी. 90 दिवसाच्या आत वाहन ताब्यात न घेतल्यास अनामत रक्कम व 90 दिवसांची दंडाची रक्कम वसूल करण्यात येईल व लिलाव रद्द करण्यात येईल.

16. कोणत्याही लिलावधारकाची बोली कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारणे या बाबतचे अधिकार समितीने राखून ठेवलेले आहेत व त्याबाबत कोणताही पत्रव्यहार केला जाणार नाही.

17. एकदा जाहिर झालेल्या वाहनांचा लिलाव कोणतेही कारण न देता वेळेवर स्थगित करणेचा अधिकार समितीने राखून ठेवलेला आहे.

वरील अटी व शर्ती मला मान्य आहेत.

निविदा धारकाची सही

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग.

नं.सिंजिप/बांधकाम/यांत्रिकी/2494/2018
बांधकाम विभाग,
जि.प.सिंधुदुर्ग.
दिनांक- 17-10-18